## —: प्रेसनोट :—

दिनांक :—१८/०२/२०२०

फिर्यादी यांनी लोकसेवक यांचेकडे वडापाव/भजीचा व्यवसायाकरीता लायसन्स मिळविण्यासाठी विचारणा केली असता कायदेशीर लायसन्स मिळत नसल्याने तक्रारदार यांचा व्यवसाय विनापरवाना चालू ठेवण्याकरीता लोकसेवक यांनी रू. ४०००/— ची लाचेची मागणी करून ती स्विकारली म्हणून गुन्हा नोंद.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, | बृहन्मुंबई विभाग. |
| गुन्हा नोंद क्रमांक | १०/२०२० |
| कलम | कलम—७ भ्र.प्र. अधिनियम १९८८ |
| आरोपी इसम | विजय प्रकाश देवरे, वय ३९ वर्षे, हुद्दा — सहाय्यक केंद्र अधिकारी, जी नॉर्थ वॉर्ड, मुंबई अग्निशमन दलाचे, दादर पश्चिम, मुंबई. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रुपये ५०००/— |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रुपये ४०००/— |
| थोडक्यात माहिती | फिर्यादी यांनी वडापाव/भजीच्या व्यवसायाकरीता गुमास्ता लायसन्स काढलेले आहे. सदर व्यवसायाकरीता हेल्थ व फायर लायसन्सची आवश्यकता असल्याने फिर्यादी यांनी लोकसेवक विजय प्रकाश देवरे यांना फायर लायसन्सबाबत विचारणा केली असता लोकसेवक यांनी फिर्यादी यांना व्यवसायाची जागा ही लहान असल्याने फायर लायसन्स देता येणार नाही असे सांगुन त्यांना विनापरवाना व्यवसाय चालु ठेवण्याकरीता लोकसेवक यांनी रु. ५०००/— लाचेची मागणी केली.<br>फिर्यादी यांना लोकसेवकास लाच द्यावयाची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे दि. १७/०२/२०२० रोजी समक्ष येवून लेखी तक्रार दिली आहे.<br>फिर्यादी यांच्या लेखी तक्रारीवरून दिनांक १७/०२/२०२० रोजी पडताळणी करण्यात आली. पडताळणी दरम्यान लोकसेवक यांनी लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने सापळा कारवाई दरम्यान तडतोडीअंती फिर्यादीकडुन रुपये ४,०००/— लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहात पकडुन गुन्हा नोंद करण्यात आला आहे. |

अपर पोलीस उप-आयुक्त लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सत्यमेव जयते बृहन्मुंबई

( वंदना मारकर )
अपर पोलीस उप आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क** : लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग,९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.
टोल फ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२—२४९२१२१२,
फॅक्स क्र. ०२२—२४९२२६१८,
वेबसाईट—acbmaharashtra.gov.in,
ईमेल acbwebmail@mahapolice.gov.in,
ईमेल addlcpacbmumbai@mahapolice.gov.in,
फेसबुक www.facebook.com - Maharashtra ACB.
मोबाईलॲप www.acbmaharashtra.net

Scanned with CamScanner